राज्यसेवा परीक्षा-२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट अ व गट ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम- ४ (सीपीटीपी ४), २०१७ - मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- टिआरएन- २०१७ / प्र. क्र.४७ /१७ /सीपीटीपी
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ डिसेंबर, २०१७.

वाचाः

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१३/ प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दिनांक २०.१.२०१४

२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन ०२१६/ प्र.क्र. ५८/१७/सीपीटीपी, दिनांक ४ जानेवारी, २०१७

३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन ०५१७ / प्र.क्र. ३६/ सीपीटीपी, दिनांक २१.०७.२०१७.

४. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०६१७/ प्र.क्र. २५ / सीपीटीपी अ, दिनांक २९.०६.२०१७.

५. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०६१६/ प्र.क्र. ६८/सीपीटीपी ब, दिनांक २९.०६ .२०१७

६. शासन परिपत्रक क्रमांकः- टिआरएन- २०१७ / प्र. क्र.४७ /१७ /सीपीटीपी, दिनांक : २६ जुलै, २०१७.

परिपत्रक :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सरळसेवेने गट अ आणि गट ब मध्ये नियुक्त होणाऱ्या विविध संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांचा एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अनुक्रमे यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थांमार्फत सुरु करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने उपरोक्त वाचा येथील अनु. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये घेतलेला आहे. तसेच अखिल भारतीय सेवांच्या धर्तीवर या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय अ.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षा, २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या तसेच गतवर्षी प्रशिक्षणास रुजू होण्यास मुदतवाढ दिलेल्या गट-अ आणि गट-ब मधील उमेदवारांचे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण दि. १.०८.२०१७ पासून सुरू झाले आहे. या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने परिवीक्षाधीन उमेदवार व संबंधित प्रशासकीय विभाग यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना वर नमूद दि. २६.०७.२०१७ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. या परिपत्रकातील परिच्छेद (दोन)(२) मध्ये परिवीक्षाधीन अधिका-यांच्या दि. १.०८.२०१७ ते दि. ७.११.२०७ या कालावधीच्या वेतनासाठी आवश्यक निधी संबंधित प्रशासकीय विभागांनी यशदा, पुणे व वनामती नागपूर या संस्थांना अग्रिम निधी म्हणून उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व त्यादरम्यान संबंधित प्रशासकीय विभागांनी आपल्याशी संबंधित परिवीक्षाधीन अधिका-यांना नियमित वेतन देण्यासाठी त्यांचा सेवार्थ आयडी तयार करण्याची व इतर अनुषंगिक कार्यवाही करणे अपेक्षित होते.

४. या संदर्भात अ. मु. स. (सेवा) यांच्या अध्येक्षतेखाली दि. २६.१०.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये परिवीक्षाधीन अधिका-यांचे सेवार्थ आयडी तयार करण्याची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण होत नसल्याने त्या अधिका-यांना वेतनापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यावर या अधिका-यांच्या तांत्रिक प्रशिक्षणापर्यंतच्या कालावधीसाठी त्यांना प्रशिक्षण संस्थेमार्फत ठोक वेतन अदा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि. २६.०७.२०१७ च्या मार्गदर्शक सूचना सुधारीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

५. त्यास अनुसरून वर नमूद दि. २६.०७.२०१७ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. (दोन)(२) मध्ये सुधारणा करून संबंधित विभागांना आता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

"प्रशिक्षण कालावधीत सुरवातीच्या २३ आठवड्यांसाठी गट-अ संवर्गातील उमेदवारांना (पोलीस उपअधिक्षक/ सहाय्यक पोलीस आयुक्त, गट-अ संवर्ग वगळून) रु. ३०,०००/- आणि गट-ब संवर्गातील उमेदवारांना रु. २०,०००/- इतके ठोक वेतन अनुक्रमे यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर यांचेमार्फत अदा करण्यात येईल. परिवीक्षाधीन कालावधीतील खातेनिहाय तांत्रिक प्रशिक्षण या टप्प्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर (एकूण २३ आठवड्यांनंतर) (सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधिक्षक यांच्याबाबतीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर) संबंधित विभागाकडे खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाच्या टप्प्यासाठी हजर झाल्यापासून या उमेदवारांना नियमित वेतन संवर्गाच्या संबंधित प्रशासकीय विभागांकडून प्रदान करण्यात येईल. त्याचबरोबर आधीच्या २३ आठवड्यांच्या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक वेतनाची रक्कम आणि नियमित वेतन यामधील फरकाची रक्कम संबंधित विभागांकडून एक रकमी अदा करण्यात येईल. याअनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांनी या प्रशिक्षणार्थीचे सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करणे , त्यांचे डीसीपीएस करीता क्रमांक मिळविणे तसेच या प्रशिक्षणार्थीच्या वेतनासाठी आहरण व संवितरण अधिकारी नियुक्त करणे इ. कार्यवाही परिवीक्षाधीन उमेदवारांचे तांत्रिक प्रशिक्षण संपण्यापूर्वीच पूर्ण करावी. जेणेकरुन परिवीक्षाधिन अधिकाऱ्यांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता या टप्प्यावर रुजू झाल्यावर विनाविलंब नियमित वेतन प्रदान करणे शक्य होईल.."

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१२१११११०९२८९५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajit Sopanrao Deshmukh

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d2bd4ed83b4c722151f75f40dad09e69527159e04d26476bbf5363e7b1c3cb2, cn=Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2017.12.11 11:24:27 +05'30'

(अजित देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३२
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (**पत्राद्वारे),
७. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था, वनामती, नागपूर
८. सह सचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
९. उप सचिव (व्यय-४), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. निवड नस्ती, कार्यासन सीपीटीपी, सीपीटीपी-अ, सीपीटीपी-ब